# मानवजातीची कथा

लेखक : डॉ. हेन्री थॉमस
अनुवादक : साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**मानवजातीची कथा : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये ४८०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# अनुक्रमणिका

## भाग – पहिला

**मानवजातीची कथा** ........ ५
१. आरंभीच्या इतिहासाचे संक्षिप्त अवलोकन ........ ७
२. बंडखोर राजपुत्र मूसा ........ २३
३. इतिहासातील पहिला युद्धविरोधी वीर जेरिमिया ........ ३२
४. देवत्व पावलेला नास्तिक बुद्ध ........ ४३
५. ख्रिस्ताचा आध्यात्मिक पिता कन्फ्यूशियस ........ ५४
६. ज्याने साम्राज्य मिळविले; पण संस्कृती विध्वंसली असा सायरस ........ ६५
७. अथेन्सचा लोकप्रिय लोकशाही पक्ष-नेता पेरिक्लीस ........ ७१
८. अधिक चांगल्या जगाचे स्वप्न खेळविणारा प्लेटो ........ ८४

## भाग – दुसरा

**तरवारीचे व फासाचे थैमान !** ........ १०१
९. स्वत: व ईश्वर यांत जगाची वाटणी करणारा अलेक्झांडर ........ १०३
१०. हसरा, दु:खवादी एपिक्यूरस ........ ११३
११. द्वेषमूर्ती हॅनिबॉल : कार्थेजियन राजपुत्र ........ १२५
१२. जगातील कपटपटूंचा शिरोमणी कॅटो ........ १३५
१३. देव होऊ पाहणारा मनुष्य : सीझर ........ १४२
१४. नाझारेथचा बहिष्कृत ज्यू येशू ........ १५३
१५. मातृहत्यारा सम्राट नीरो ........ १६४
१६. तत्त्वज्ञानी सम्राट मार्कस ऑरेलियस ........ १७६
१७. कॉन्स्टंटाइन : जुन्या धर्मवृत्तीचा आत्मा असलेला ख्रिश्चन ........ १८३

## भाग – तिसरा

**मध्ययुगातील रानटीपणा** ........ १८९
१८. शार्लमन : पोपला वाचवून स्वत: सम्राट होणारा ........ १९१
१९. संन्यासी पीटर : अमीन्सचा माथेफिरू भिक्षू ........ १९५
२०. कॅथॉलिक पंथी बंडखोर : ॲसिसीचा साधू फ्रॅन्सिस ........ २०३
२१. मुक्या शतकांचा आवाज : डान्टे ........ २१२

२२. युरोप व आशिया यांमधील दुवा : मार्को पोलो ........ २२०
२३. नवयुगाचे तीन पुरस्कर्ते : पेट्रार्क, जोहान्स हस, जॉन बॉल ........ २२७
२४. ऑर्लिन्स येथील कुमारी जोन ऑफ आर्क : फ्रान्सची माता ........ २३७
२५. टॉर्कीमीडा व पवित्र 'इन्क्विझिशन' न्यायसंस्था ........ २५१
२६. अमेरिका न शोधणारा कोलंबस ........ २६१
२७. कला-विज्ञान-वेत्ता लिओनार्डो डी व्हिन्सी ........ २६८

## भाग – चौथा

**मानवजातीची जागृती** ........ २८१
२८. पोपला धाब्यावर बसविणारा शेतकरी मार्टिन ल्यूथर ........ २८३
२९. सैतानाचा शिष्य मॅकिऑव्हिली ........ २९१
३०. नवसृष्टीचा निर्माता शेक्सपिअर ........ ३००
३१. फ्रेंच राजांपैकी अति प्रसिद्ध राजा चौदावा लुई ........ ३१३
३२. अहिंसक, युद्ध-प्रतिकारी जॉर्ज फॉक्स ........ ३२२
३३. ॲमस्टरडॅम येथील शांतमना स्पायनोझा ........ ३३२
३४. रशियावर सुधारणा लादणारा पीटर दि ग्रेट ........ ३४३
३५. व्हॉल्टेअर ........ ३५०
३६. जग जिंकूनही निर्वासित अवस्थेत मरणारा नेपोलियन ........ ३६३

## भाग – पाचवा

**खऱ्या संस्कृतीचा प्रारंभ** ........ ३७३
३७. गटे : हा पाहा खरा मनुष्य ........ ३७५
३८. संयुक्त युरोपचे स्वप्न खेळवणारा इटालियन नेता : मॅझिनी ........ ३९०
३९. समाजवादाचा जनक कार्ल-मार्क्स ........ ४००
४०. प्रशियाचा प्रतिगामी चॅन्सेलर विस्मार्क ........ ४१२
४१. आपल्या पूर्वजांचा परिचय करून देणारा चार्लस डार्विन ........ ४१८
४२. कृष्णवर्णियांचा त्राता अब्राहम लिंकन ........ ४३१
४३. द्वेषविहीन जगाचे ध्येय देणारा टॉलस्टॉय ........ ४४०
४४. शेवटचा कैसर सम्राट दुसरा वुइल्यम ........ ४५२
४५. मॅकिऑव्हिलियन पद्धत पत्करणारे ........ ४५९
४६. हुकूमशाही विरुद्ध लोकशाही : मुसोलिनी, हिटलर, रुझवेल्ट ........ ४७२

✦✦✦

# भाग पहिला

## मानवजातीची कथा

**प्रकरण : १**

# आरंभीच्या इतिहासाचे संक्षिप्त अवलोकन

– १ –

माकडातून उत्क्रांत होत होत प्राणी जन्माला यायला जवळजवळ चार कोटी वर्षे लागली. त्याला ताठ उभे राहता यायला व दगडधोंड्यांनी आपले भक्ष्य मारून खाता यायला आणखी तीन लक्ष वर्षे लागली. पुढे आणखी पन्नास हजार वर्षे गेली आणि त्याला तांब्याचा शोध लागला. मारण्याची, संहाराची अधिक प्रभावी हत्यारे तो बनवू लागला. त्यानंतर दोन हजार वर्षांनी त्याला लोखंड सापडले. हिंसेची साधने अधिक प्रखर अशी तयार झाली. मारण्याच्या पद्धतीत अधिक कौशल्य आले. लोखंडाच्या शोधानंतर पाच हजार वर्षांनी डायनामाइटचा शोध लागला. त्यानंतर कित्येक शतकांनी त्याने पाणबुड्या बांधल्या व विमाने बांधली आणि दुसऱ्या प्राण्यांचा संहार करण्याची त्याची संशोधक बुद्धी पूर्णतेस पोहोचली. मानवाच्या मत्थड मेंदूला 'हिंसा म्हणजे मूर्खपणा आहे'. ही गोष्ट कळायला आणखी पन्नास हजार वर्षे लागतील. संहार करण्यापेक्षा हितकर व उपयोगी अशा दुसऱ्या उद्योगात वेळ दवडणे अधिक चांगले, ही गोष्ट तेव्हा त्याच्या लक्षात येईल.

मनुष्य अगदी मत्थड प्राणी आहे. फारच हळूहळू त्याची प्रगती होत आली आहे; आणि जी काही थोडीफार प्रगती झाली, तीही सारखी अखंड होत आली असेही नाही. कधी प्रगती तर कधी अधोगती, असे सारखे चालले आहे. उंचावरून कितीदा तरी हा प्राणी खाली घसरला आहे, वर चढून पुन्हा कितीदा तो खाली पडला

आहे. आजच्या बहुजन समाजापेक्षा २४०० वर्षांपूर्वीचे ग्रीक अधिक सुधारलेले होते. अधिक सुसंस्कृत व प्रगत होते. १९०० वर्षांपूर्वीच्या रोम शहरात कचरा व घाण वाहून नेण्याची आजच्यापेक्षा अधिक उत्कृष्ट पद्धती होती. याच्या उलट तीनशे वर्षांपूर्वीच्या बर्लिन शहरामधील पीटरच्या चर्चसमोर कचऱ्याच्या व घाणीच्या राशी पडलेल्या असत व नाकाला रुमाल लावावा लागे. इ.स. १६५० पर्यंत पॅरिस शहरातील लोक रस्त्यावर मलमूत्राची भांडी खुशाल फेकीत, १८४९ मध्ये इमर्सन हा बोस्टन शहरात राहात होता. तेथील नागरिकांनी जरा नीट वागावे म्हणून तो किती खटपट करायचा ! १९२९ मध्ये या बोस्टन शहरात सरकारी निरीक्षकांना ''स्ट्रें इन्टरल्यूड'' या बोलपटाला बंदी करावी लागली.

मानवी प्रगतीचा प्रवाह फार आस्ते चालला आहे. एवढेच नव्हे, तर मनुष्याच्या आडमुठेपणामुळे व मूर्खपणामुळे हा पुन्हा पुन्हा मागे सारण्यातही आला आहे. इतिहासाचे सम्यक् आकलन होण्यासाठी या दोन गोष्टी सदैव ध्यानात ठेवल्या पाहिजेत. तिसरीही एक महत्त्वाची गोष्ट आपणास सांगतो; आणि ती म्हणजे मनुष्य हा फार आळशी प्राणी आहे. तो आपण होऊन कधीही प्रगती करणार नाही. प्रगतीचा त्याला तिटकारा आहे. ही नसती उठाठेव कशाला? का ही डोकेफोड, असे त्याला वाटे. कधी मोठे संकट, फार मोठी आपत्तीच आली तर तो पाऊल पुढे टाकू पाहतो, शत्रूचा हल्ला आला, नैसर्गिक उत्पात झाले तरच तो हातपाय हलवतो, डोके चालवतो, प्रगती करायची की जागीच नष्ट होऊन जायचे, असाच प्रश्न जेव्हा समोर उभा राहतो, तेव्हाच हा मनुष्य प्राणी जरा निराळे वळण घेतो, थोडी प्रगती करतो.

या नैसर्गिक आपत्ती म्हणजेच प्रगतीची प्रेरणा. अशीच एक पहिली प्रेरणा त्या मोठ्या हिमयुगात आली.

– २ –

इतिहासपूर्व काळी युरोपची व आशियाची हवा आजच्यापेक्षा बरीच उष्ण होती; अधिक उबदार होती. आपले केसाळ पूर्वज रानावनात भटकत: कंदमुळांवर पानाफळांवर राहात; मिळालेच कधी तर कच्चे मांस खात. त्यांचे हाडपेर बळकट होते, परंतु पाय जरा वाकलेले होते. त्यांना तितके नीट ताठ उभे राहता येत नसे. जरा बुटबैंगण असे ते होते. आजच्या स्त्री-पुरुषांपेक्षा ते आकाराने बरेच लहान होते.



विस्तवाचा शोध अद्याप त्यांना लागला नव्हता. त्यांच्या अंगावर वस्त्र नव्हते. त्यांची भाषाही नीटशी नव्हती. निरनिराळे आवाज व आरोळ्या यांनी मनातील भाव ते एकमेकांस दाखवीत. भूक लागली म्हणजे ते कधी कधी एकटे किंवा कधी दोघे-तिघे असे भक्ष्याच्या शोधार्थ निघत. भूक शांत झाली म्हणजे एखाद्या वृक्षाच्या किंवा दगडाच्या छायेत पाय पोटात घेऊन ते बसत. पुन्हा भूक लागली किंवा शत्रूच आला, एखादा अधिक बलवान प्राणी आला, तरच मग ते उठत.

अशा रीतीने दहा लक्ष पिढ्या गेल्या; आणि एके दिवशी आपल्या या आलस्यमय जीवनातून ते खडबडून जागे झाले. डोंगरातून, पहाडातून अपरिचित प्राणी धावत आले; भीतीने आरोळ्या मारीत, किंचाळ्या फोडीत ते आले. ज्या दिशेने आले त्या दिशेकडे ते भीतीने पाहात होते. काय दिसत होते तिकडे? दूर भुरेभुरे असे काहीतरी दिसत होते. एखाद्या प्रचंड अक्राळविक्राळ जिवंत प्राण्याप्रमाणे ती वस्तू हळूहळू पुढे येत होती. हवा अति गारगार वाटू लागली. सर्वांना अस्वस्थ वाटू लागले. आकाश काळे काळे झाले आणि आकाशातून पृथ्वीवर बारीक बारीक तुकड्यांची प्रचंड वृष्टी होऊ लागली. आकाशातील त्या हिमशलाका उघड्या शरीरावर पडू लागल्यावर काय दुर्दशा झाली असेल तिची कल्पना करा ! सारे शरीर असे बधीर झाले. दातखिळ्या बसल्या. एक प्रकारचे तीव्र व अननुभूत असे दु:ख होऊ लागले. ती पहिल्या हिमपाताची वेळ होती.

त्या येणाऱ्या हिमवृष्टीपासून ते लोक पळाले. परंतु कितीतरी जणांस भरभर पळता येईना. पुष्कळ जण थंडीने गारठून मेले. जे दूर गेले व वाचले, त्यांनी खोल गुहांमध्ये आश्रय घेतला. ऊब मिळावी म्हणून व संरक्षण व्हावे म्हणून सारे एकमेकांस खेटून, जसे काही चिकटून बसले. आपल्या त्या वानरसदृश्य पूर्वजांना सामाजिक जाणिवेची ती पहिली प्रभा त्या वेळेस मिळाली. सामाजिक-सामुदायिक जाणिवेची ती पहिली अंधुक उषा होती. मानवतेच्या उंबरठ्यावर प्रथमच ते चढत होते-पहिले पाऊल टाकीत होते.

जरूर पडली, आणि अन्नासाठी म्हणून ज्या प्राण्यांना ते मारीत, त्यांची कातडी सोलून काढून त्यांनी ती स्वत:च्या अंगाभोवती गुंडाळली. थंडीपासून बचाव करणे जरूर होते आणि पुढे विस्तवाचा शोध लागला. दोन काष्टे एकावर एक घासून ठिणगी पडते हे त्यांनी पाहिले. थंडीपासून रक्षण करून घेण्यासाठी ते चांगलेच साधन मिळाले.

तसेच स्वत:चे रक्षण व्हावे म्हणून गुहांत शिरून बसलेल्या इतर क्रूर पशूंपासूनही या विस्तवाच्या शोधामुळे स्वत:चा बचाव त्यांना करता येऊ लागला. जवळजवळ पन्नास हजार वर्षांपूर्वी हा विस्तवाचा शोध लागला असावा. १८ व्या शतकातील विजेचा शोध जितका महत्त्वाचा, तितकाच महत्त्वाचा हा प्राचीन अग्निशोध होता.

विस्तवाचा शोध लागला. कातडी पांघरू लागले. त्याचबरोबर प्रकट वाणीही जन्मली. बोलायला लागण्यापूर्वी ते आधी गाऊ लागले असावेत. ज्या वेळेस त्यांना अस्वस्थ व असुखी वाटत असे, त्या वेळेस ते सारे एकदम दु:खाने किंचाळत; जेव्हा एखादी सुंदरशी शिकार त्यांना मिळे; किंवा स्वच्छ सूर्यप्रकाश पडे, तेव्हा ते आनंदाने आवाज करीत. हळूहळू या सर्वांतून अतुटक असे 'क' वर्गातील गान निर्माण झाले. त्यांच्यातील जे अधिक प्रतिभावान व प्रगतिशील होते, ते आपल्या मनातील नवीनच उगवलेले विचार अधिक स्पष्टतेने प्रकट करू लागले. आपल्या आवाजात भर घालून, त्याला काही जोडून, ते विचार प्रकट करू पाहात. अशा रीतीने भाषेतील पहिली अक्षरे जन्माला आली.

वाणीमुळे ज्याप्रमाणे मनुष्यप्राणी इतर प्राण्यांपासून पृथक झाला, त्याचप्रमाणे हत्यारांच्या व नानाविध यंत्रांच्या शोधामुळेही हा गुहेतील मानवप्राणी मानवेतर प्राण्यांपासून निराळा झाला. आणि पहिले यंत्र म्हणजे आपला हात. आपल्या या हाताने फेकता येते, हा अगदी आरंभीचा अति महत्त्वाचा शोध. हाताने जवळच नव्हे तर लांब अंतरावरसुद्धा दगड मारता येतो, हा शोध ज्या आदि काळातील एडिसनने लावला त्याचे मानव जातीवर फार ऋण आहे. तो अज्ञात असा एडिसन अत्यंत बुद्धिमान असला पाहिजे. संस्कृती व सुधारणा त्याची अत्यंत ऋणी आहे. मारण्याची जी सुंदर कला, तीत त्या वेळेपासून मनुष्य इतर प्राण्यांच्या सदैव पुढे राहिला !

वस्तू कशी फेकावी हे कळताच फेकण्याच्या निरनिराळ्या वस्तूंचा, अधिक प्रभावी हत्यारांचा शोध होऊ लागला. दगडधोंडे व काठ्यालाठ्या त्याला अपुऱ्या वाटू लागल्या. आपले भक्ष्य अधिक सहजतेने मारता यावे म्हणून घासून घासून अणकुचीदार काठी तो करू लागला. दगडांनासुद्धा धार लावून त्याचे सुळके तो करी. मृत पशूंचे कातडे सोलून काढण्यासाठी, तसेच मांसखंड करण्यासाठी या पाषाणी हत्यारांचा उपयोग मनुष्य करू लागला. स्वत:साठी व कुटुंबातील इतरांच्यासाठी तो अशा प्रकारे मांस तोडी.



आणि अशाच रीतीने हळूहळू प्रगती होत आजची वाफेची यंत्रे जन्मली. विद्युत यंत्रे जन्मली. हे शोध लागणे ही गोष्ट आश्चर्याची नसून हे शोध लागायला इतकी हजारो वर्षे लागली हे आश्चर्य होय. वास्तविक चार-पाच वर्षांतच हे शोध लागले पाहिजे होते. परंतु यासंबंधी पुढे बोलू. सध्या मानवजातीच्या त्या आरंभीच्या प्रगतीसंबंधीच बोलू. ही जी पहिली ओबडधोबड हत्यारे मानवाने निर्मिली, त्यांच्या साहाय्याने दोन गोष्टी त्याला करता येऊ लागल्या. स्वत:चे संरक्षण करणे व दुसऱ्यास मारणे. परंतु आपल्या या अगतिक व एकाकी प्रयत्नांनी तो या दोन्ही बाबतीत फारशी प्रगती करू शकला नाही. आपणाहून अधिक सामर्थ्यसंपन्न अशी एखादी वस्तू त्याला पाहिजे होती; त्या सामर्थ्यसंपन्न शक्तीचे साहाय्य त्याला हवे होते. आणि अत्यंत महत्त्वाचा असा एक शोध लावण्यात त्याला यश आले. मानवाने ईश्वराला निर्मिले. देवाचा किंवा अनेक देवांचा शोध लावला.

देवाचा शोध कसा लागला याविषयी नाना उपपत्ती आहेत; परंतु सर्वांत अधिक शक्य अशी पुढील उपपत्ती वाटते. मानवप्राणी स्वत:च्या छाया पाण्यात बघत. स्वप्नांत आपल्या मित्राच्या आकृती ते बघत. आपणा सर्वांस जणू दोन शरीरे आहेत असे त्यांना वाटले. एक हे दैनंदिन इंद्रियगम्य शरीर, ज्याला आपण हातांनी स्पर्श करतो; आणि विशिष्टच प्रसंगी कधी कधी दिसणारे व बहुधा नेहमी अदृश्य असणारे असे ते दुसरे छायामय शरीर. मनुष्य मरतो तेव्हा त्याचे ते स्थूल शरीर पुरले जाते; परंतु त्याचे ते दुसरे छायामय शरीर नष्ट होत नाही. ते स्वप्नात आपणास दिसते, भेटते. ते छायामय शरीर कोठेतरी जिवंत असलेच पाहिजे.

समजा, एखाद्या जातिजमातीचा प्रमुख मनुष्य मेला, तो जिवंत होता तेव्हा त्याला सारे भीत; परंतु आता मेल्यावर तो अधिकच भीतिप्रद झाला. कारण त्याचे ते छाया शरीर आता अदृश्य असणार. छायाशरीरधारी तो न्यायक कधी येईल व हल्ला करील ते कळणारही नाही. आपण कदाचित त्याला असंतुष्ट केले तर काय होईल, काय न होईल, असे या दुबळ्या व दुर्दैवी मानवाला वाटे.

त्याची कृपा असावी म्हणून पूजा, प्रार्थना, देणग्या यांची लाच त्याला सुरू झाली. व प्रबळ व भयंकर दूताला संतुष्ट ठेवले पाहिजे. हा प्रेतात्माच प्रचंड वादळाच्या वेळी कडाडतो, गरजतो; ज्वालामुखीच्या रूपाने त्याचाच क्रोधाग्नी प्रकट होतो; ज्यांच्यावर त्याची अवकृपा होते. त्यांच्यावर रोगांची, मृत्यूची कृपा होते. नवीन

जन्मणाऱ्या मुलांमध्ये प्राण तोच घालतो. (त्या आदिमानवाला लैंगिक संबंधांपासून नवीन जीव जन्माला येतो याची अर्थातच अजिबात कल्पना नव्हती.) हा जो शक्तिमय, छायामय प्रेतात्मा, त्याच्या ताब्यात आणखी एक अपूर्व अशी गोष्ट होती. हवेत तरंगणारी अशी ही गूढ रहस्यमय वस्तू होती. तिचे नाव दैव. हे दैव कधी हात देई तर कधी दूर लोटी. तुम्ही व तुमचे मित्र एके दिवशी युद्धाला गेलात. तुमचा मित्र मारला गेला आणि तुम्ही वाचलात. का? तुम्ही काहीतरी महत्त्वाची अशी गोष्ट केली असावी, की जी तुमच्या मित्राने केली नाही. परंतु हे तुम्ही कसे सांगणार, तुम्हाला काय माहीत? काही शहाणे लोक पुढे आले. त्यांनी या गोष्टीचा शोधबोध करण्याचे ठरविले. ते दैवज्ञ झाले. ते धर्मोपाध्याय झाले, मंत्रज्ञ झाले. ते छायात्मे, तो तुमचा देव, त्याची कृपा व्हावी व त्याची अवकृपा टळावी म्हणून काय करावे, काय करू नये ते सांगू लागले. असे केल्याने तुमच्या सुदैवाचा भाग तुम्हास मिळेल असे ते सांगत. या धर्मोपाध्यायांची आज्ञा सदैव मानलीच पाहिजे. आज्ञाभंग कराल तर मरणाची किंमत द्यावी लागेल !

त्या प्राचीन जगात अशा काहीतरी प्रकाराने धर्म अस्तित्त्वात आला. पहिले देव म्हणजे मृत नायकाचे प्रेतात्मे असत. अशा रीतीने आरंभी मानवाने ईश्वर निर्मिला. त्याने स्वत:च्यासारखाच हा ईश्वर निर्मिला आणि असा हा ईश्वर निर्मून त्याच्यासमोर तो लोटांगण घालू लागला. आपल्या या देवासमोर जो कुणी गुडघे टेकणार नाही त्याला तो ठार करी.

ईश्वराचा शोध लागल्याने काही दुष्ट गोष्टी सुरू झाल्या. परंतु या शोधाबरोबर काही भलेही जन्मले. मनुष्यातील कलात्मकतेचा जन्म याच वेळेस झाला. धर्माच्या पाठोपाठ कला आली. सुदैवाचा संपूर्ण वाटा मिळावा म्हणून, विशेषत: शिकार चांगली सापडावी म्हणून, जे प्राणी मारण्याची इच्छा त्या आदिमानवाला असे, त्या प्राण्यांची चित्रे तो गुहांच्या तोंडावर काढू लागला. भाल्याने त्या चित्रमय आकृतींना जर दुरून नेम मारता आला तर शिकारीत यश येईल असे तो समजे. ज्या प्राण्यांच्या त्या आकृती असत, त्या प्राण्यांना मारायला देव आपणास समर्थ करतील, असे तो मानी. आकृती जितकी हुबेहूब असेल, तितका त्या प्राण्यांच्या शिकारीचा संभव अधिक. म्हणून आपल्या कलेत निर्दोषता यावी यासाठी तो तासन तास दवडी. सुधारणेच्या व संस्कृतीच्या त्या आरंभकाळी गुहांच्या तोंडावर रंगवलेली ती चित्रे आजच्या वास्तववादी यथार्थ चित्रांहून फार कमी दर्जाची आहेत, असे नाही.



मंत्रतंत्रावर, जादूटोण्यांवर हा जो विश्वास होता, त्यातून ती पहिली सौंदर्याची जाणीव जन्माला आली. परंतु पुढे लवकरच म्हणजे आणखी दहा हजार वर्षांनी कलेसाठी म्हणून कला तो उपासू लागला. हिमयुगाच्या आरंभी स्वसंरक्षणार्थ हत्यारे व साधने त्याला शोधावी लागली, हे आपण पाहिलेच. पुढे जेव्हा त्याची संकटे कमी झाली तेव्हा त्याला फुरसत मिळाली. आपली हत्यारे तो भूषवू लागला. त्यांच्यात सौंदर्य व सुभगता आणू लागला. त्याच्या त्या दगडी कुऱ्हाडीला हातात धरण्यासाठी दांडा तर हवाच, परंतु तो दांडा सुंदरही असला पाहिजे. त्या दांड्याचा आकार त्याने हातासारखा केला; इतकेच नव्हे तर त्याने त्याला घासून घासून गुळगुळीत केले. त्याच्यावर सुंदर आकृती त्याने काढल्या. मनुष्य केवळ भाकरीने जगत नाही ही गोष्ट आपल्या पूर्वजांनी मानवी जीवनाच्या अगदी आरंभीच जणू ओळखली. आजचा सौंदर्योपासक मानव हा काही नवीन प्रकार नव्हे. मी सुंदर आहे म्हणून मी जगावे. सौंदर्यासाठी म्हणून सौंदर्य, ही भावना पंचवीस हजार वर्षांची तरी जुनी आहे.

आपले पूर्वज दुसरी एक कला लवकरच शिकले व ती वाढवते झाले. ही कला म्हणजे युद्धाची कला. त्या वेळेस अन्न फार कमी असे. अन्नप्राप्तीची साधने अपुरी होती. अशा वेळेस एका जमावाला दुसऱ्या जमावाशी, एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीशी अन्नासाठी लढावे लागे. आपले जीवन मोठ्या मुश्किलीने त्यांना टिकवावे लागे. तशा प्रकारच्या संहाराची वास्तविक आता जरूर नाही, परंतु संहाराची लालसा मानवी हृदयात पूर्वीइतकीच आजही तीव्र आहे. प्रत्येक सुधारलेल्या देशात युद्ध ही अत्यंत लोकप्रिय कलांपैकी एक कला अद्याप मानली जात आहे.

प्राचीन इतिहासाच्या या संक्षिप्त वर्णनावरून आपणास दिसून येईलच की, जे गुण वा दुर्गुण आजच्या अर्वाचीन माणसांत आहेत तेच बहुतेक सारे पंचवीस हजार वर्षांपूर्वीच्या आपल्या वानरसदृश्य पूर्वजांमध्ये होते. गुणांच्याविषयी म्हणायचे झाले तर त्या बाबतीत आपण काही अधिक प्रगती केली आहे असे नाही आणि दुर्गुणही आपण दूर केले आहेत असे म्हणता येणार नाही. मनुष्य हा होता होईतो आपली मूर्खता टाकू इच्छित नसतो.

– ३ –

सुसंस्कृत व सुधारलेल्या जीवनाकडे मानवप्राणी कसा चाचपडत जात होता, त्याचे अत्यंत त्रोटक दर्शन आपण घेतले. हिमप्रपातामुळे मनुष्य एकमेकांच्या कसा

जवळ येऊ लागला ते आपण पाहिले. हिमप्रपाताचे चार काळ होऊन गेले. सामाजिक जीवनाची पहिली जाणीव त्या संकटसमयी झाली. विस्तवाचा शोध लागला. कपडे करू लागले. हत्यारे बनवू लागले. भाषा निर्माण झाली. देवदेवता उत्पन्न झाल्या. चित्रकला, प्रार्थना व संहार या कलांत त्यांनी बरीच प्रगती केली. या अति प्राचीन काळाविषयीची आपणास उपलब्ध झालेली माहिती अद्याप फारच अपुरी आहे. सापडलेली काडी-हाडे, काही कवट्यांचे अवशेष, जमिनीतून खणून काढलेली काही हत्यारे, गुहांच्या व घरांच्या भिंतीवरून रंगविलेली काही चित्रे... बस, हीच आपली सामग्री. या आधारावर त्या प्राचीन काळातील इतिहास उभारावयाचा. परंतु या तुटपुंज्या साधनांतूनही इतिहासकाळपूर्व पूर्वजांच्या जीवनाचे नीटनेटके चित्र तयार केले. माहिती नीट जुळवून त्या जीवनाची चांगली कल्पना येईल, असे केले. बारीकसारीक तपशिलाच्या बाबतीत मतभेद असू शकतील, परंतु त्या चित्रांतील मुख्य गोष्टींसंबंधी साधारणत: सर्वांचे एकमत आहे.

वानरापेक्षा थोड्या उच्च भूमिकेवर तो पहिला मानव उभा होता. त्या हिमप्रपातामुळे त्याची सुधारणा झाली. सुमारे बारा हजार वर्षांपूर्वी त्या हिमवृष्टीनंतर ज्या भूमिकेवर मानव उभा होता, ती भूमिका आजच्या सर्वसाधारण मनुष्याच्या भूमिकेपेक्षा फारशी खालची नाही. ख्रिस्तशतकापूर्वी सुमारे दहा हजार वर्षे जे आपले पूर्वज होते, ते जरी फार सुधारलेले नसले, तरी बऱ्याचशा गोष्टी त्यांना अवगत झाल्या होत्या. पाककला, कुंभारकाम, टोपल्या विणणे, वस्त्रे विणणे इत्यादी बाबतीत त्यांनी बरीच प्रगती केली होती. कुत्री, गई-गुरे, शेळ्या-मेंढ्या, डुकरे इत्यादी प्राण्यांना माणसाळविण्यास ते शिकले होते. मुंगीच्या मेंदूइतपत त्यांची प्रगती झाली होती. मुंगी ज्या गोष्टी करू शकते त्या त्या ते करू लागले होते. बुद्धीची तितपत वाढ झाली होती. मुंग्यासुद्धा आपला नातलग जो मानवप्राणी, त्याच्याप्रमाणे खालच्या जीवजंतूंना माणसाळवितात. त्यांना आपले घरकाम करायला लावतात. मुंग्यांचीसुद्धा गाईगुरे असतात. काही विशिष्ट जंतू मुंग्या पाळतात. दुधासारखा द्रव ते जंतू देतात. त्या जंतूंच्या पाठीवर थोपटून मुंग्या हा रस काढतात. या आपल्या गाईंसाठी मुंग्या गवताचे बारीक रेशमी धाग्याचे गोठे बांधतात. या गोठ्यात त्या गाईंना मुंग्या दडवतात. बारा हजार वर्षांपूर्वीचा मानवही हे सारे करू लागला होता व ओबडधोबड गोठ्यात गाईगुरे ठेवू लागला होता.



त्या इतिहासपूर्व काळात ज्या गोठ्यांतून गाईगुरे राहात, त्यातच माणसेही राहात. जेथे गुरे तेथेच गुरांचे धनी. हे गोठे किंवा या झोपड्या सरोवराच्या मध्यभागी काहीतरी उंच उभारून त्यावर बांधण्यात येत. किनाऱ्यांशी लाकडी पुलाच्या योगाने या झोपड्या जोडलेल्या असत. हे पूल रात्रीच्या वेळेस काढून ठेवीत. कोणी शत्रू येऊ नये म्हणून. या झोपड्यांतील जागा शेणाने लिंपलेली असे. शेण आधी पायाखाली खूप तुडवीत. घरातील एका बाजूला गाईगुरे असत. एका बाजूला माणसे, स्त्रिया, पुरुष, मुले, गाईगुरे सर्वांचे मिळून जणू झालेले कुटुंब-जरा गोंगाट असे. शांती नसे. परंतु बरे होते. लोक जमिनीवरच खाली बसत; तेथेच खात; तेथेच झोपत. खुर्च्या, खाटा, मेजे इत्यादी प्रकार करावयास मनुष्य अद्याप शिकला नव्हता. ताटे, चमचे, सुऱ्या, चाकू इत्यादी प्रकार अजून नव्हते. ख्रिस्तशतकाच्या पंधराव्या शतकापर्यंत जेवणाच्या काट्यांचा शोध लागला नव्हता. काट्यांचा शोध लावण्याइतपत हुशार मेंदू इसवी सनाच्या पंधराव्या शतकापर्यंत तयार झाला नव्हता.

बारा हजार वर्षांपूर्वीचे युरोपातील हे आपले सरोवरनिवासी पूर्वज असे होते. दहाबारा पिढ्यांपूर्वीच्या युरोपातील शेतकऱ्यांची जी स्थिती होती, तीच त्या बारा हजार वर्षांपूर्वी युरोपात वसाहत करणाऱ्या त्या सरोवरवासीयांची होती. केनट्की पर्वतात राहणाऱ्या आजच्या डोंगरी लोकांचा जितपत मानसिक विकास आहे त्याहून त्या बारा हजार वर्षांपूर्वीच्या युरोपातील सरोवरवासीयांचा मनोविकास कमी नव्हता. जीवनाच्या शाळेतील मानवप्राणी हा अत्यंत गचाळ व मंदबुद्धी असा प्राणी आहे.

सरोवरवासीयांच्या काळातच मानवजातीचे चार मुख्य वंश झाले होते; गोरे, पिवळे, आफ्रिकी व ऑस्ट्रेलिया हे काळे होते. हे चारी वंश त्याच मूळ पूर्वजांपासून जन्मले. आज आपल्या कातडीचा रंग जरी निराळा असला, तरी आपले पूर्वज एकच होते. एकाच पूर्वजांपासून आपण झालो, परंतु त्या हिमयुगात आपले पूर्वज सर्वत्र पांगले. ते हिमयुग जवळजवळ एक लक्ष वर्षे होते. निरनिराळ्या ठिकाणी पांगल्यामुळे शरीराची वाढ निरनिराळी झाली. त्या त्या ठिकाणचे हवापाणी, त्या त्या ठिकाणचे अन्न, तेथील एकंदर निसर्ग परिस्थिती, या सर्वांचा शरीरावर परिणाम होऊन निरनिराळे असे हे नमुने तयार झाले. या सर्वांना भिन्नभिन्न वंशाचे असे वास्तविक म्हणता येणार नाही. एकाच वंशवृक्षाच्या या चार आप्त शाखा आहेत. तसेच काही जातींना इतर जातींपेक्षा उच्च मानणे हीही चूक आहे. संस्कृतीची उच्चता ही कातडीच्या रंगावर

किंवा चेहरेपट्टीवर अवलंबून नसते. दुसऱ्याच गोष्टींवर सांस्कृतिक श्रेष्ठता अवलंबून असते. संस्कृती-सुधारणेच्या प्रगतीत काही जातिजमाती मागे पडल्या, याचे कारण ज्या वेळेस हे हिमयुग होते, त्या वेळेस जरी पांगापांग झाली त्या वेळेस या काही जातिजमाती पृथ्वीच्या अत्यंत दूर अशा टोकांना गेल्या. त्यांचा इतरांशी संबंध राहिला नाही. ते तसेच तिकडे एकटे पडून राहिले. जगाशी संबंध न राहिल्यामुळे त्या प्रारंभिक बाल्यावस्थेतून ते बाहेर पडू शकले नाहीत.

जेथे निरनिराळे लोक एकत्र येतात, एकमेकांशी दळणवळण ठेवतात, एकमेकांत मिसळतात, जेथे विचारांची व अनुभवांची देवाण-घेवाण असते, तेथे सुधारणेची शक्यता असते. पृथ्वीच्या काही भागांत प्रगती का झाली, आणि काही ठिकाणचे मानवप्राणी अप्रगत का राहिले, याची ही अशी मीमांसा आहे. ऑस्ट्रेलियाच्या आग्नेय दिशेस तासमानिया आहे. भाकरीचा लहानसा तुकडा भाकरीजवळच पडलेला असावा तसा हा तासमानियाचा लहानसा तुकडा पडलेला आहे. १६४२ मध्ये डच लोकांना या बेटावर मूळचे रहिवाशसी आढळले. पन्नास हजार वर्षांपूर्वी त्यांचे पूर्वज तेथे प्रथम आले. ते पूर्वज जसे राहात असत, तसेव हे रहिवासी इ.स. १६४२ मध्येही राहात होते. दक्षिण अमेरिकेचे अत्यंत दक्षिणेकडचे टोक जे टायराडेल फ्यूगो, तेथे जे लोक आहेत, त्यांना अद्याप अंगावरील कपडे घालण्याइतपतही बुद्धी नाही. तासमानियातील लोकांचा शेवटचा वंशज इ.स. १८८७ मध्ये मेला. हे तासमानिई वटायराडेलफ्यूगो लोक संस्कृतीच्या संग्रामातील हरलेले लोक आहेत. या परागंदा झालेल्या पलटणी जणू आहेत. कित्येक हजार वर्षांपूर्वी पृथ्वीच्या एका बाजूस हे बिचारे पडले, आणि पाषाणकाळातील तो साधा निष्पाप रानवटपणा तसाच त्यांच्यात राहिला.

परंतु याच्या उलट नील नदीच्या खोऱ्यात मानवजातीचे निरनिराळे प्रवाह एकत्र आले. अन्न व निवाऱ्याची जागा शोधणाऱ्या मानवांना या टापूतून वरचेवर जावे लागे. येथे भेटीगाठी होत. सरमिसळ होई. दुसरा एक टापू म्हणजे पश्चिम आशियातील युफ्रातीस आणि तैग्रीस या नद्यांचा. तैग्रीस व युफ्रातीस यांचा दुआब फुलला. नील नदीचे खोरे फुलले. या दोन स्थानी संस्कृतीने पहिले मोठे पाऊल टाकले. बर्फातून, पर्वतांतून, वाळवंटातून, समुद्रकिनाऱ्यापासून हजारो लोक येथे आले. त्या त्या मानवप्रवाहाने स्वत:च्या विशिष्ट कल्पना बरोबर आणल्या. स्वत:ची दैवते, स्वत:च्या



चालीरीती, स्वत:चे विचार घेऊनच तो तो मानवी प्रवाह येई. त्या सर्व प्राथमिक संस्कृतींच्या संघर्षांतून-संमिश्रणातून नवीन विचार जन्मले; कल्पनाशक्ती बहरली. रानटीपणाच्या बाल्यावस्थेतून संस्कृती-सुधारणेच्या रम्य पाठशाळेत मानव-जात जायला तयार झाली. हे पाऊल उचलायला मानव उभा राहिला.

इजिप्तमधील सुधारणेची आरंभीची स्थिती आपण थोडक्यात पाहूया.

– ५ –

ज्या प्रदेशाला पुढे नील नदीचे खोरे असे नाव मिळाले, त्या प्रदेशात कित्येक हजार वर्षांपूर्वी केवळ सर्वत्र चुनखडीचे दगड होते. शेवटच्या हिमयुगातील बर्फ जेव्हा वितळले, तेव्हा या प्रदेशावर सर्वत्र पाणीच पाणी झाले. तीस मैल रुंदीची एक खाडीच जन्मली. हळूहळू पाणी ओसरले. या खोऱ्यांत एक सुपीक टापू तयार झाला. भटक्या लोकांना येथे पृथ्वीवरचा स्वर्गच जणू मिळाला. येथे रानबाजरी व इतर खाद्यपदार्थ भरपूर होते. हवा सुंदर होती. पाणी विपुल होते. हिमयुगात निराधाराप्रमाणे सर्वत्र भटकणाऱ्या मानवास अत:पर भटकण्याची जरूरी राहिली नाही. अन्न शोधीत भ्रमंती करण्याची कटकट उरली नाही. या नील नदीच्या खोऱ्यात या लोकांची वसाहत केली आणि त्यांची लोकसंख्या भराभर वाढली. नील नदीचा प्रवाह हा जणू जोडणारा धागा. या प्रवाहाने त्या सर्व मानवांना एकत्र जोडले. त्यांचा एक समाज बनला. ते परस्परांशी प्रेमाने वागू लागले. सुमारे सहा हजार वर्षांपूर्वी ही गोष्ट घडली.

नील नदीच्या खोऱ्यात हे जीवन एकंदरीत सुखकर होते; परंतु मधूनमधून आपत्ती येत. काही काळ गेला म्हणजे नील नदीला पूर यावयाचा. अद्याप कालगणना शोधली गेली नव्हती. नदी नेहमीच प्रेमळ मैत्री दाखवील असे दिसेना. पृथ्वीतून नेहमीच धनधान्य वर येईना. अशी संकटे येत. आणि या वेळेस त्यांच्यात एक प्रतिभावान पुरुष जन्मला. अलौकिक बुद्धी त्याची असली पाहिजे. अन्न आपोआप उगवते असे नव्हे; तर जमिनीत बी पेरून आपणास ते वाढवता येणे शक्य आहे, असा शोध त्या माणसाने लावला. कसा लावला देव जाणे. अकस्मात तो शोध दैवयोगाने लागला असावा. त्याबरोबर दुसराही एक विचार त्यांच्या डोक्यात डोकावला की, सारे अन्न एकदम खाता आले नाही, तरी ते आपण पुढच्या काळासाठी साठवून ठेवू शकतो.

हा शोध फार महत्त्वाचा होता. कारण शिल्लक पडलेले धान्य साठवून ठेवण्यासाठी म्हणून ते मातीची मडकी करू लागले. कोठारे बांधून ठेवण्याची कल्पना सुचली. या कुंभारकामातून पुढे स्वयंपाकाची भांडीही तयार होऊ लागली. धान्यासाठी कोठारे बांधता बांधता मोठमोठी घरे व राजवाडे ते पुढे बांधू लागले.

प्रथम स्वत:चे विचार ते तोंडाने सांगत परंतु एक प्रकारची चिन्हलिपी त्यांनी शोधून काढली. ही चिन्हे पवित्र चित्रांची असत. लोकांना आपली शासने अधिक बंधनकारक वाटावीत म्हणून पवित्र चित्रांची ही चिन्हलिपी शोधली गेली.

अशा रीतीने मिसर देशातील धर्मोपाध्याय यांनी प्रथम लेखनाचा शोध लावला. मागच्या पिढीने स्वत:चा मूर्खपणा पुढच्या पिढीसाठी लिहून ठेवण्याची ही पद्धत अशा रीतीने जन्माला आली.

देवदेवतांची इच्छा काय आहे, ते धर्मोपाध्याय सांगत. या ब्राह्मण वर्गाबरोबरच दुसरा एक वर्ग उदयास आला. देवदेवतांची इच्छा प्रत्यक्ष मूर्त स्वरूपात आणणारा हा वर्ग होता. प्रबळ असा क्षत्रियांचा हा वर्ग किंवा जमीनदारांचा वर्ग. दुष्काळ केव्हा येईल वा भरपूर धान्य केव्हा पिकेल, ते धर्मोपाध्याय सांगत. उद्योगी लोक येणाऱ्या कठीण दिवसांसाठी धान्य साठवून ठेवीत. ते शेजाऱ्यांना पुढे उपयोगी पडे. इतर लोकांना जिवंत ठेवता येईल अशी साधने मिळाल्यावर हे उद्योगी लोक इतरांचे पुढारी बनले. ते धनी झाले. जमीनदार झाले. त्यांच्यात जो अत्यंत हुशार व अत्यंत प्रबळ होता, तो सर्वांहून अधिक दुष्ट व कपटी होता. त्याने इतर स्पर्धकांस स्पर्धाक्षेत्रांतून दूर केले; आणि इतिहासातील पहिला वैभवशाली राजा जन्माला आला. ईश्वरी इच्छेने हा पहिला राजा जन्मला नाही; तर स्वत:च्या धूर्ततेने तो राजा झाला.

राज्यसंस्थासुद्धा जमिनीत धान्य पेरण्यातून जन्मली असण्याचा बराचसा संभव वाटतो.

धान्य पेरण्याच्या कल्पनेतूनच अमृतत्त्वाची कल्पना निघाली असावी. मृत व जमिनीत गाडलेले धान्य पुन्हा अंकुरते, त्यातून नवीन जीवन बहरते, यात अमृतत्त्वाच्या कल्पनेचा उगम आहे. मातीत पुरलेल्या बीजांतून नवीन सजीव सस्यांकुर जन्मतात, त्याचप्रमाणे मृत शरीरांतून पुन्हा सजीव आत्मे जन्माला येतील म्हणून मृतांच्या शरीरांचा सांभाळ केला पाहिजे. मृत शरीरे नीट ठेवण्याची कला जन्मली. मृतांसाठी या मिसरी लोकांनी प्रचंड व भव्य मंदिरे बांधली. मृतांसाठी जी घरे बांधावयाची ती



टिकाऊ असली पाहिजेत. मजबूत घरे अधिक सुंदर व समर्थ अशी असली पाहिजेत. कारण ते मृतात्मे या दगडी घरांतून कायमचे राहणार !

अशा रीतीने पिरॅमिड बांधले गेले. या कलेची वाढ फारच आश्चर्यकारक झपाट्याने झाली. संस्कृती व सुधारणा यांची अशीच प्रगती होत असते. हजारो वर्षे लंगडत, अडखळत एखादे पाऊल ती टाकते. नंतर एकदोन शतके उड्या मारीत जणू ती जाते आणि पुन्हा आलस्याची शतके सुरू होतात. हजारो वर्षे जणू पुन्हा एक प्रकारची अर्धवट स्थगिती येते. पिरॅमिड बांधण्याचा काळ हा इजिप्तच्या सांस्कृतिक इतिहासातील उड्या मारीत जाण्याचा काळ होता. एकदम प्रगतीची जशी उकळी आणि भरती आली ! ओबडधोबड दगडांची थडगी बांधण्यापासून तो गिझे येथील भव्यतम पिरॅमिड बांधण्यापर्यंत इजिप्तने एकदम मजल मारली. ही आश्चर्यकारक प्रगती होती.

गिझे येथील हा पिरॅमिड वाळवंटाच्या कडेला बांधलेला आहे. आजच्या विसाव्या शतकातील गगनचुंबी अमेरिकन इमारतींप्रमाणे हा पिरॅमिड उभा आहे. तो पाचशे फूट उंच आहे. त्याच्या पायाने तेरा एकर जमीन व्यापली आहे. जगातील आजची सर्वात मोठी इमारत घेतली तर तिचा पाया याच्या तिसऱ्या हिश्शानेही नाही, असे दिसेल.

मिसर लोकांचे हे राष्ट्र काही फारसे मोठे नव्हते परंतु त्यांच्या कल्पना प्रचंड असत. त्यांची महत्त्वाकांक्षा उत्तुंग होती. स्वत:च्या महत्त्वाकांक्षेनेच ते मेले. मृत राजांसाठी हे प्रचंड पिरॅमिड तर त्यांनी बांधलेच, देवतांसाठी प्रचंड आकारांची मंदिरे त्यांनी उभारलीच; इतकेच नव्हे, तर त्यांनी त्याचे ८०-८०, ९०-९० फूट उंचीचे पुतळे बनविले; आणि याबरोबरच प्राचीन इतिहासातील अत्यंत शिस्तीचे असे सैन्यही त्यांनी उभारले. हे जे लष्करी भूत त्यांनी उभारले त्यानेच त्यांचा शेवटी अध:पात झाला. काही काळपर्यंत त्यांनी इतर राष्ट्रांना जिंकले. परंतु पुढे ते स्वत:च जिंकले गेले; आणि मानवजातीच्या रंगभूमीवरून निघून जाऊन दुसऱ्यांना त्यांनी जागा करून दिली.

– ६ –

जगातील प्रत्येक युद्धप्रिय राष्ट्र अशाच प्रकारे नष्ट झाले आहे, असे आपणास पुढे दिसेल. विजयाचा उन्माद, दुसऱ्यास जिंकून घेण्याची अभिलाषा शेवटी